-63- 1143375 68-03-

विदर्भातील ४ जिल्ह्यांतील शालेय संस्थांना
एकसालीने दिलेल्या जमिनी कायम देण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : एलएनडी-१०७७-१२७१-सीआर-४९५-ग-१.
मंत्रालय, मुंबई क्रमांक : ४०० ०३२
दिनांक : २१ मार्च, १९८४

२८

## निर्णय

सन १९६० पूर्वी विदर्भातील यवतमाळ, बुलढाणा, अकोला, व अमरावती, या जिल्ह्यांत " अधिक धान्य पिकवा " या मोहिमेखाली तेथील शालेय संस्थांना [School Committees)एक सालीने सरकारी जमिन स्वत: कसण्यास दिली होती. सुमारे ११३७ शालेय संस्थांना जवळजवळ ५९८५, हेक्टर क्षेत्र सरकारी जमिन एकसालीने दिलेली असून त्यांची एक सालीची मुदत वेळोवेळी वाढविण्यांत आली आहे.

२. परंतु सदर जमिन शालेय संस्था स्वत: न कसता नियमा विरुध्द दरवर्षी लिलावानें जमिनीची विल्हेवाट लावीत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. जरी दरवर्षी जमिनीच्या लिलावाने येणारे उत्पन्न शाळांच्या सुधारणे करिता या शाळा वापरीत असल्या तरी सरकारी जमीन स्वत: न कसता दुस-यांना तात्पुरत्या पटट्याने देणे हा एक सालीच्या कराराच्या अटी व शर्तींचा उघड भंग आहे. शिवाय आता या शालेय संस्था जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत असल्यामुळे या संस्थांना शासनाकडून शंभर टक्के अनुदान मंजूर होत असल्याने ज्या इतर जिल्हा परिषदेच्या शाळांना अथवा याच जिल्हा परिषदेच्या इतर शाळांना असे उत्पन्न मिळत नाही, त्यांच्या बाबतींत एक प्रकारे भेदभाव केल्या सारखे झाले आहे. या परिस्थितीत विदर्भातील वरील चार जिल्ह्यांतील शालेय संस्थांना एकसालीने ~~दिलेली~~ दिलेली जमिन परत काढून घ्यावी किंवा कसे या बाबतचा प्रश्न कांही काळ शासनाच्या विचाराधीन होता. या बाबत शासनाने काळजीपूर्वक विचार करुन असा निर्णय घेतला आहे कीं, या शालेय संस्थांना ही एकसालीने ~~दिलेली~~ दिलेली जमिन त्यांना कायम द्यावी, परन्तु या साठी अशी अट घालण्यांत यावी कीं, त्यांनी ही जमिन स्वत: मशागत करुन शेतीसाठी, फलोत्पादनासाठी, अगर सामाजिक वनी करणासाठी

RB 5/4/84

1052

जिल्हाधिकारी रत्नागिरी.
—कार्यालय—

RB

उपयोगांत आणावी. पुढे असे ही ठरविण्यांत आले आहे कीं, ही जमिन भाडेपटट्याने अगर लिलावानें दुस-यांना देण्यास सदर संस्थांना परवानगी देण्यांत येऊ नये आणि जर ही जमीन भाडेपटट्याने अगर लिलावाने दुस-याला देण्यांत आली तर ती जमिन शासनाने परत आपल्या ताब्यांत घ्यावी.

३. म्हणून यवतमाळ, बुलढाणा, अकोला, व अमरावतीच्या जिल्हाधिका-यांना शासनाचे असे आदेश आहेत कीं, त्यांनी शासनाच्या वरील निर्णया प्रमाणे महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ व त्या खालील नियमांस आधीन ठेवून त्यांच्या जिल्ह्यांतील शालेय संस्थांना एकसालीने दिलेली जमिन, वर उल्लेखिलेल्या प्रयोजनार्थ स्वत: कसण्याच्या अटींवर कायम देण्यांत यावी. शेती हा एक विषय असलेल्या शाळांना ही एकसालीने दिलेली जमिन कायम दिल्या नंतर स्वत: कसण्याची कांही अडचण राहाणार नाही. तथापि, शेती हा विषय नसलेल्या शाळांनी सुध्दां विद्यार्थ्यां-कडून झाडे लावून त्यांची निगा राखणे वगैरे कार्यक्रम हाती घेऊन जमिनीचा वापर करावा. अशा त-हेचे बंधान जमिन कायमरित्या देतांना घालावें असे जिल्हाधिका-यांना आदेश आहेत. त्यां साठी आवश्यक असे मार्गदर्शक आकृतीबंध शिक्षण खात्याच्या संमतीने तयार करण्यांत येत आहे. ह्या प्रकारे कायम जमिन दिल्या नंतरही जमिन पडीत ठेवल्यास अथवा त्याचे अन्यथा हस्तांतर केल्यास त्यांच्याकडून ती जमिन काढून घ्यावी.

४. तसेच पश्चिम महाराष्ट्रांतील धुळे, अहमदनगर, पुणे, सांगली, कोल्हापूर, व सोलापूर, या जिल्ह्यांतील सुमारे ३१ शालेय संस्थांना सुमारे १८९ हेक्टर सरकारी जमीन एकसालीने कसण्यासाठी दिली आहे. त्या संस्था स्वत: जमिन कसीत असल्यानें कायदेशीररित्या ही जमीन कायम मिळण्यास त्या संस्था पात्र आहेत. ह्या संस्थांनी जमिन पडीक ठेवल्यास अथवा त्याचे अन्यथा हस्तांतर केल्यास वरील निर्णया प्रमाणें त्यांच्या कडूनही जमिन काढून घ्यावी असे शासनाचे आदेश आहेत.

५. शासनाचा वरील निर्णय, जिल्हाधिका-यांनी सर्व तहसिलदारांच्या माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कारवाईसाठी नजरेस आणावा. तसेच ह्या बाबत केलेल्या कारवाईचा अहवाल जिल्हाधिका-यांनी शासनास सादर करावा.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ अं. द्व. वाईटला ]

कार्यासन अधिकारी, ग-१ कार्यासन,

महसूल व वन विभाग.

-----३